**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## क्रीडा विभाग – वेटलिफ्टिंग स्पर्धा

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### राजगुरू महाविद्यालयात वेटलिफ्टिंग स्पर्धा

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा क्रीडा परिषदेंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटना व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ व २६ सप्टेंबर रोजी आंतरशालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग मुले व मुलींच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील १७ व १९ वर्षे वयोगटाखालील एकूण ९० मुले व ८१ मुलींनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेचे उद्घाटन प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, अनिल राक्षे, महाराष्ट्र वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष सुधीर म्हाळसकर, नितीन वरकड, लतिफ शेख, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.


**१७१ खेळाडूंनी नोंदविला सहभाग**

प्रांताधिकारी दौंडे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असून, त्यांनी खेळाच्या माध्यमातून करियर करण्याचा विचार करावा. ऑलिंपिक स्पर्धेपर्यंत आपले ध्येय ठेवून सराव करावा. योग्य मार्गदर्शन आणि समतोल आहार घेऊन प्रचंड मेहनत करावी, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले. तालुका क्रीडा अधिकारी मोहारे व संस्थाध्यक्ष अॅड. बुट्टे पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेतून विभागीय स्तरावर १७ वर्षांखालील वयोगटातील नेत्रा थोरात, प्रीती दुंडे, तपस्या मते, संतोषी सुपे, सई शिंदे, आर्या गायकवाड, मुग्धा ओझरकर, श्वेता तनपुरे रुबीहा पाठका आणि १९ वर्षांखालील वयोगटातील जानवी बोरसे, आर्या वाघमारे, दीक्षा मानेदेशमुख, सुहाना शेख, आरती राठोड, तनिष्का बोडके मुलींची निवड झाली. तर १७ वर्षाखालील वेदांत ढोरे, नीरज राळे, ज्ञानेश दुधाळे, साईराज शिंदे, तुषार निकम, रोहन राळे, विराज ढोरे, आर्यन वरकड, साईराज पाटोळे, सुशील कांगणे, साहिल अडचले आणि १९ वर्षांखालील आर्यन सिंग, साई गायकवाड, ओंकार गाडे, आयुष मुरूमकर, देवेश पाटील, संकेत बोराडे, संस्कार वाघवले, श्रेयस अवताडे या मुलांची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली. स्पर्धेचे नियोजन क्रीडाशिक्षक प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. योगेश मोहिते, प्रा. सारिका गोरे आदींनी केले होते.

My Gramin Edition
Sep 28, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

लोकमत



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आंतरशालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

# राजगुरू कॉलेजात जिल्हास्तर वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन

## जिल्ह्यातील १७ महाविद्यालयातील ९० मुलांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : जिल्हा क्रीडा परिषद अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटना व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५ व २६ सप्टेंबरला आंतरशालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील १७ व १९ वर्षे वयोगटाखालील एकूण ९० मुले व ८१ मुलींनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन खेडचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, अनिल बाबा राक्षे, महाराष्ट्र वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष सुधीर म्हाळसकर, नितीन वरकड, लतिफ शेख, प्राचार्य डॉ. एस. एस पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रांताधिकारी अनिल दौंडे म्हणाले, की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असून, त्यांनी खेळाच्या माध्यमातून करिअर करण्याचा विचार करावा. ऑलिम्पिक स्पर्धेपर्यंत आपले ध्येय ठेवून सराव करावा. योग्य मार्गदर्शन आणि समतोल आहार घेऊन प्रचंड मेहनत करावी, असे आवाहन केले. तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे व संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.. विभागीय स्तरावर १७ वर्षांखालील वयोगटातील नेत्रा थोरात, प्रीती दुंडे, तपस्या मते, संतोषी सुपे, सई शिंदे, आर्या गायकवाड, मुग्धा ओझरकर, श्वेता तनपुरे रुबीहा पाठका आणि १९ वर्षांखालील वयोगटातील जानवी बोरसे, आर्या वाघमारे, दीक्षा मानेदेशमुख, सुहाना शेख, आरती राठोड, तनिष्का बोडके यांची निवड करण्यात आली आहे.

### १७ वर्खर्ष लिल या मुलांची झाली निवड

१७ वर्षाखालील वेदांत ढोरे, नीरज राळे, ज्ञानेश दुधाळे, साईराज शिंदे, तुषार निकम, रोहन राळे, विराज ढोरे, आर्यन वरकड, साईराज पाटोळे, सुशील कांगणे, साहिल अडचले आणि १९ वर्षाखालील आर्यन सिंग, साई गायकवाड, ओंकार गाडे, आयुष मुरुमकर, देवेश पाटील, संकेत बोराडे, संस्कार वाघवले, श्रेयस अवताडे या मुलांची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली. या स्पर्धेचे आयोजन क्रीडाशिक्षक प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. योगेश मोहिते, प्रा. सारिका गोरे यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Sep 28, 2024
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

## राजगुरू महाविद्यालयात वेटलिफ्टिंग स्पर्धेला प्रतिसाद



**राजगुरूनगर** : जिल्हा क्रीडा परिषद अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय , खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटना व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५ व २६ सप्टेंबर रोजी आंतरशालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील १७ व १९ वर्षे वयोगटाखालील एकूण ९० मुले व ८१ मुलींनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेचे उदघाटन खेडचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, अनिल बाबा राक्षे, महाराष्ट्र वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष सुधीर म्हाळसकर, नितीन वरकड, लतिफ शेख, प्राचार्य डॉ. एस. एस पिंगळे, प्राचार्य डॉ.एच एम जरे, प्रबंधक के.आर. पाचारणे उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन क्रीडा शिक्षक प्रा तानाजी पिंगळे प्रा.प्रतिमा लोणारी, प्रा. योगेश मोहिते, प्रा.सारिका गोरे यांनी केले.

Pimpri Chinchwad Edition
Sep 28, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख